2019-20

Impact Factor – 6.625 E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed-Referred & Indexed Journal
January-February-March 2020
Vol.-7 Issue-1



Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625 **E-ISSN – 2348-7143**

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed-Referred & Indexed Journal
January-February-March 2020
Vol.-7 Issue-1

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.

- Chief & Executive Editor

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : **www.researchjourney.net**

© **All rights reserved with the authors & publisher** **Price : Rs. 1000/-**

Cover Page Photo : Scientiest Meenal Bhosale, (Covid 19 Testing kit developed in India in Record Time)

मराठी विभाग

52	'चिनी मातीतील दिवस' : एक आकलन	डॉ. संगिता शेळके	250
53	मराठी दलित आत्मकथने : भूक आणि कथन	डॉ. प्रकाश जाधव	256
54	ग्रामीण साहित्यासमोरील आव्हाने	डॉ. पुरुषोत्तम जुन्ने	260
55	संयुक्त पुरोगामी आघाडी – एक राजकीय अभ्यास	डॉ.विक्रमराव पाटील	264
56	पोर्तुगीजपूर्व मराठी साहित्य : डॉ. वि. बा. प्रभुदेसाईकृत संशोधन	श्री. इराप्पा गुरव	269
57	संत ज्ञानेश्वरकृत चांगदेव पासष्टीतील दृष्टांत : एक अभ्यास	डॉ. धनराज धनगर	279
58	संत तुकारामांच्या अभंगातील लोकविचार	डॉ.रावसाहेब ननावरे	283
59	'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम' संदर्भात चाळीसगाव तालुक्यातील उच्च प्राथमिक शाळा स्तरावरील कार्यवाहीचा आढावा	श्री. ओमप्रकाश थेटे, डॉ. पंकजकुमार नन्नवरे	288
60	माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना भूगोल विषयातील संकल्पनांच्या आकलनासाठी KWLH अध्ययन तंत्राच्या सहाय्याने होणाऱ्या अध्यापनाच्या परिणामकारकतेचा अभ्यास	डॉ.वंदना चौधरी	294
61	लाल लजपतराय यांचे अमेरिकेतील योगदान	डॉ.राजेंद्र रासकर	298
62	'ऋतुरंग' मधील निसर्गचित्रण	सौ. योगिता राजकर	301
63	महाराष्ट्र : कृषी पर्यटन आणि रोजगार निर्मितीं स्वरूप	डॉ. विवेक चौधरी	306
64	'हाकारा' व 'ढोल' या नियतकालिकांतील स्फुट आदिवासी कविता	डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर	310
65	मुखेड सत्याग्रह	डॉ. उज्वला भिरुड (नेहेते)	320
66	श्री.साईबाबासंस्थान,शिर्डी निर्मित पायाभूत सुविधांचे रोजगार विकासातील योगदान	प्रा. ज्ञानेश्वर रांधवणे	324
67	खानदेशी बालसाहित्यातील नव्या बोलीभाषा प्रयोगाचे प्रणेते : आबा महाजन	तुषार वडगावकर, डॉ. वासुदेव वले	330
68	अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व व स्वआत्मविश्वास यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास	डॉ. संगीता भालेराव	334
69	ओवीगीतांचे संशोधन	डॉ. भास्कर शेळके	338
70	प्रसार माध्यमे व सामाजिक विकास	डॉ. आशालता जावळे	342
71	आचार्य विज्ञानभिक्षुंचा प्रमाण विचार – स्वतंत्र प्रज्ञेचा आविष्कार	डॉ. कलापिनी अगस्ती	346
72	स्त्रीजीवनाची गाथा : 'धग'	डॉ. रेखा वडिखाये	354
73	महात्मा गांधी आणि स्त्रीशिक्षण	डॉ. जे. एफ. पाटील	358
74	भारतीय अर्थव्यवस्था आणि प्रधानमंत्री मुद्रा बँक कर्ज योजना : आव्हाने आणि निरीक्षणे	डॉ. अकोश गोस्वामी	361
75	आदिवासींच्या विविध देवता	डॉ. अंजली मस्करेन्हस	366
76	शेतकऱ्यांची आत्महत्या आणि प्रसार माध्यमे	डॉ. दिनकर माने, भगवान सूर्यवंशी	371
77	'लैंगिक शोषण' या सामाजिक समस्येचा समाजशास्त्रीय अभ्यास	डॉ. कल्याण मोरे	376
78	गुजराती व बंजारा बोलीचा भाषिक अभ्यास	डॉ. विष्णू राठोड	381
79	साक्री तालुक्यातील अहिराणी बोलीच्या ओवीतून प्रतिबिंबित झालेले 'सप्तशृंगी' देवीचे चित्रण	डॉ. प्रकाश साळुंखे	390
80	कृषि-पाराशर-प्राचीन भारतीय जैविक शेती परिचय	प्रा. दर्शना सायम	393
81	लावणीतील कलगी –तुरा	डॉ.राजेंद्र वाटाणे	398
82	भारतातील आरोग्य सुविधांची उपलब्धता व खर्चाचे विश्लेषण	डॉ. एम. के. नन्नवरे	404

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Vol. 7, Issue 1
Peer Reviewed Referred & Indexed Journal
E-ISSN : 2348-7143
Jan. Feb. March. 2020

'हाकारा' व 'ढोल' या नियतकालिकांतील स्फुट आदिवासी कविता.

प्रा. डॉ. ज्ञानेश्वर अंबादास वाल्हेकर
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख,
बी. डी. काळे महाविद्यालय,
घोडेगाव ता. आंबेगाव जि. पुणे. ४१२४०८
मोबा. ९४२१००११७४
Email Id dr.dawalhekar@rediffmail.com

पुणे येथील महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक 'हाकारा' व वडोदरा (गुजरात) येथून आदिवासी चेतनेचे नियतकालिक 'ढोल' मधून महाराष्ट्रातील आदिवासी कवींच्या कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत.

वरील प्रस्तुत नियतकालिकांमधून आदिवासी कवींच्या पहिल्या पिढीतील प्रथम कवयित्री उषाकिरण आत्राम, गंगाधर कुरसंगे, लक्ष्मण कदम, रा. वि. भुस्कुटे, पुरुषोत्तम शेडमाके, दशरथ मडावी, रायसिंग ठाकरे, संघजा मेश्राम, सोपान सुरकुले, प्रभू राजगडकर, रवि कुरसंगे, चामुलाल राठवा इ. नी आंदिवासी जाणिवेतून काव्यलेखन केले आहे. या सर्व कवींच्या कवितांमध्ये आदिवासी जीवनाच्या व्यथा, वेदना प्रकट होतात. नव्या आशयविश्वाची भर आदिवासी कवितेने मराठीत टाकली आहे. प्रतिमासृष्टी सुद्धा आदिम जीवन संस्कृतीशी निगडित आहे. आदिवासी कुलभूषण एकलव्याची प्रबळ प्रेरणा या कवितेला आहे. इतिहासातील पराक्रमी आदिवासी शूरवीर ही सर्वच आदिवासी कवींची श्रद्धास्थाने आहेत.

१. उषाकिरण आत्राम

आदिवासी कवितेच्या क्षेत्रातील पहिल्या पिढीतील आघाडीच्या कवयित्री म्हणून उषाकिरण आत्राम ओळखल्या जातात. 'हाकारा' त्रैमासिकामधून त्यांच्या 'जथे', 'मोहरकी', 'जन्म न देणाऱ्या मांची कथा', 'मी व कोणाची', 'शृंगार', 'बिरसा मुंडा', 'प्रित', 'सांग राणे', 'आसू! टिपागड पहाडीतले!!', 'माही दुनिया बुडाली', 'आश्रम शाळा' इ. काही कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत. आदिवासी स्त्रीच्या पारंपरिक भूमिकेला नकार, विद्रोह आणि ऐतिहासिक चिकित्सा ही उषाकिरण आत्राम यांच्या काव्यलेखनाची वैशिष्टये आहेत.'जथे' या कवितेत गतकाळातील आद्यमानवसमूह असलेला आजचा आदिवासी बंदिस्त जीवन आता जगणार नाही. हीच भावना कवयित्रीने शब्दबद्ध केली आहे. उदा.

''कालची खुरटी झाडे आता गर्द पालवू लागली
पंख तुटलेल्या राव्यांची त्यावर गर्दी दिसू
लागली
कालचे बंदिस्त रावे, पिंजरा तोडून आले
अन् बेलाशक झाडावरची फळं चाखून चव
सांगू लागले''

बंदिस्त जीवन व जंगलाश्रित जीवनाला नकार देऊन विकासाची फळे चाखायला मिळत आहे.

'मोहरकी' या कवितेत 'मोहरकी' म्हणजे गोंडातील घोटूलात स्त्रियांचं नेतृत्व करणारी नायिका होय. या कवितेत कवयित्रीने आपल्या सखीला विद्रोहाचा सल्ला दिला आहे. लाचारी, शोषण, अमानुषता, दु:ख, दारिद्र्य

या अवस्थेत किती दिवस राहायचे, हे सर्व नाकारून आपल्या सर्व सख्यांना सावधानतेचा इशारा दिला आहे, तो असा की,

''मी तुमची मोहरकी आहे
फेकून द्या ते फाटक्या पदराचे बुजगावणे
सोडून फेका – बंदिस्त माळाचे जोखाडणे
नजरेतील भिंती टाकून द्या!
ही घ्या पेटती मशाल
मी निघालेपाठीमागून तुम्ही या!''

सामाजिक बांधिलकीचे स्त्री नेतृत्व या रचनेतून प्रत्ययास येते.

'जन्म न देणाऱ्या मांची कथा' या रचनेचा विचार करता, भारतभूमीचे आदिसंतान असलेल्या आदिवासींनी या मातृभूमीवर निर्व्याज प्रेम केले आहे. परंतु प्रस्थापित व्यवस्थेने मात्र या धरतीच्या लेकरांची बेशरमपणे थट्टा केली आहे. या धरतीच्या लेकरांना आईचं वात्सल्य प्रेम, माया, ममता कधी मिळाली नाही. म्हणून कवयित्री म्हणते की,

''फाटक्या आतडीला दोरा घातलाच नाही
मायेचं गर्भारमायपण मी भोगलच नाही
मां म्हणून कुणी हाक मारलीच नाही''

'मी व कोणाची' या कवितेत आदिवासी गोंड स्त्री ही एक उपभोग्य वस्तू आहे असे मानले जाते. या कवितेत एका सासुरवाशीण गोंड कन्येची विवंचना लक्षात येते. पुरुषप्रधानतेचं वर्चस्व असणाऱ्या आदिम जमातीत स्त्री म्हणजे पायताण, कुत्री असे समजले जाते. तिला कोणतेही हक्क व अधिकार नाही. आई – वडील, भाऊ, सासू – सासरा, शेजारी हे सर्वच तिच्यावर हक्क सांगतात. सावकार, जमीनदार, रेंजर, नवरा हे सुद्धा सासुरवाशीण स्त्रीवर अधिकार सांगतात. आपल्या कामपूर्तीचं साधन मानतात. अत्यंत उद्विग्न व हतबल मनःस्थितीत या कवितेतील गोंडकन्या म्हणते की,

''सांग मायमी वं कोणाची
बापाची भावाची?
नवऱ्याची – सावकार – रेंजर – पाटील
जमिनदारांची – शिंप्याची – सोनाराची – की
आणखी
सांग मी कोणाची?''

'शृंगार' ही कविता संवादात्मक आहे. या कवितेतील आदिवासी माय आपल्या लेकीला पारंपरिक बेडयांतून मुक्त करीत आहे. अंगावर गोंदून घेणे, रेलाँत नाचणे, शरीर उघडे ठेवणे या परंपरागत भूमिकांना नकार देणारी माय आहे. या सर्व परंपरा पालनात मायचा जन्म गेला. स्वानुभवाने शहाणी झालेली माय आपल्या लेकीला परंपरा नाकारण्याचे सांगते आहे. कारण टेलर, सावकार, पुढारी, साहेब या सर्वांच्या कामुक नजरा भिरभिरत असतात. साध्या – भोळया गोंड कन्येला ढोलाच्या तालावर फसविले जाते. म्हणून तिने शृंगार करू नये. रेलाँत नाचू नये. असा सावधानतेचा इशारा स्त्री रक्षणार्थ देते.

''सावध हो पोरी!

रान जळत आहे
फूल गळत आहे
''गोंदून निळी होवू नगं काळी''
रानफुलासारखी डवरं
हो ! सूर्यसळी!
हो ! नागकमळी
हो ! सूर्यफूल
हो ! तांबडी पळसाची लाल अंगार
तरच उठून दिसलं
ह्या बाजार फुक्याले तुहा ''शिणगार''

विद्रोही शृंगाराची सूचकता कवयित्री प्रकट करते.

'बिरसा मुंडा' या कवितेत बिहारमधील आदिवासींचा स्वातंत्र्यसूर्य असलेल्या बिरसा मुंडा या क्रांतिकारकाचे कवयित्रीने केलेले वर्तमानातील स्मरण आहे. आजच्या वर्तमानातील आदिवासी स्त्रियांचा छळ, आदिम समाजाच्या व्यथा, वेदना, दु:ख, भय यातून मुक्तता करण्यासाठी बिरसाने पुन्हा रूप धारण करावे. बिरसाचा 'ऊलगुलान' पुन्हा सुरू होण्याची ही विनवणी आहे. उदा.

''घेवून ये रे बाबा
क्रांतीचा नवा रेलाऽऽ ठेमसा
आणि पहाट गर्भातून सूर्य येण्याआधीच
तोड सारी साखळदंड आणि करून टाक
मोकळे
बिरसा! म्हणूनच ये रे आमचा
नवा आशादीप होवून!''

आदिवासींच्या शोषणमुक्त, भयमुक्त समाजरचनेसाठी त्याने आशादीप होऊन यावे.

'प्रित'या कवितेतून कवयित्रीने पृथक प्रेमविषयक भावना प्रकट केलेल्या आहेत. या कवितेतील प्रियकर प्रेयसी हे रानबांधवांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचार निर्मूलनासाठीच्या लढ्यासाठी सिद्ध आहेत. आदिमांची खोरी नासवणारी बेमुर्वत हरामखोरी धुवून काढून रान पुन्हा फुलारण्यासाठी रानकपारीतून आदिमांचा मोर्चा पुढे आल्यावर प्रेयसी प्रियकराला म्हणते की, ''प्रियत्तमा पहिली लढाई आपलीच!'' याच लढाईत बिरसा मुंडा फाशीवर गेला. एकलव्याचा अंगठा गेला. या घटनांची चुकती करू या. यासाठीच

''दूरवर.....ऊलगुलान! ऊलगुलान!
गगनभेदी हुंकार रानभर धावत होते!''

'सांग राणे' या कवितेत कवयित्री आपल्या सखीला सटवीला जागृत करत आहे. कारण गोंड स्त्रियांना सांस्कृतिकतेच्या नावाखाली रेलाँ नृत्यात नाचवलं जातं. नासवलं जातं. नागवलं जातं. ही शोषक स्त्री जीवनाची वाटचाल कवयित्री रोखण्यास सांगते आहे

''तू माय, दंडार ढेमस्यातच डुंबून जातेस
सांग राणे? तू कुठल्या भारताच्या मातीआड

राहतेस?
सांग? तू कुठल्या भारताचं गीत गातेस?
रानशे! आता तरी बोलती हो!''

आदिवासी भारतातील स्त्री – कणव यातून प्रत्ययास येते.

'आसू! टिपागड पहाडीतले!!' ही कविता टिपागड पहाडातल्या आदिवासींची वेदना शब्दबद्ध करते. मूळनिवासी व जंगलचे राजे आज मात्र मूलभूत समस्येमुळे वंचित आहेत. त्यांना गुन्हेगार, चोर ठरविले जात आहे. गडचिरोली, चंद्रपूर या परिसरातील नक्षलवादी गटांनी आदिवासी कुटुंबाचा छळवाद मांडला आहे. यामुळेच

''आमचं जगणं 'मरणं'
रोज डोयानं पाहातो
आम्ही इचारावं कोणा?
हे जीणं की 'मरण'?''

आदिवासींच्या मरणाला ते स्वत: साक्षी आहे. 'जगणं' आणि 'मरणं' ही नित्याची बाब झाली आहे.

'माही दुनिया बुडाली' या कवितेतील आदिवासी स्त्रीचं दु:ख जगावेगळं आहे. रानातील मोळी विकून उदरनिर्वाह करणारी, परंतु अपयश पदरी आल्यावर करुण दु:खाला सामोरे जावे लागते. मोळी विकून तापाने फणफणलेल्या मुलाला आंबील करून त्याला देत आहे, परंतु

''नाही हालला झूलला 'जीव कवासा उडाला
भूकपायी तान्हा माझा 'जीव घेऊन निघाला''

'भूकबळी' हा आदिवासींच्या जीवनात भीषण रूप धारण करणारा आणि स्त्रियांना सतावणारा गंभीर प्रश्न आहे. यामुळे आदिवासी आईचे सर्वस्व असलेले मूल परिस्थितीने 'भूकबळी' ठरविले आहे.

'आश्रमशाळा' ही कविता आईशी संवाद साधणारी आहे. आश्रमशाळेमधून आदिवासी मुलामुलींचे शिक्षण होत असले तरी शोषणाधिष्ठीत, विषमताग्रस्त आश्रमशाळेतील शिक्षणावरील, तेथील शिक्षकांवर कवयित्रीचा विश्वास नाही. कारण आश्रमशाळा हे स्त्रीशोषण, लैगिक छळ व विकृती, स्त्री लंपटता या सर्वांचं एक वासनाकेंद्र बनत चालल्याची खंत या कवितेतून प्रत्ययास येते. ज्ञानदानाऐवजी प्रेम, लैगिकता, अश्लीलता, शरीरसुख शिकवणाऱ्या स्त्रीलंपट व वासनाविकृतीने पछाडलेल्या शिक्षकांवर विश्वास राहिला नाही. यामुळे आश्रमशाळेतील मुलीचे भवितव्य अंधारात आहे. पावित्र्याची जागा बेईमान शिक्षकांनी घेऊन ते दलाल बनले आहेत. आश्रमशाळेचे वरिष्ठ अधिकारीही सोयिस्करपणे दुर्लक्ष करतात. या शोषणातून मुक्त करणारा देवराया कोणीही नाही, अशी अगतिकता व हतबलता प्रत्ययास येते. म्हणून आश्रमशाळा म्हणजे

''हे तर ठरले आहे – नराधमाचे कुरण
आश्रमशाळा आदिवासी मुलांचे मरण
हे तर ठरले अब्रू शोषणाचे सरण
आश्रमशाळा अत्याचार अश्लीलतेचे तार
आई! आई! हे तर आदिवासी पिढीचे
जीवंत मरण
रानातले सावज – दऱ्यातले नाग आणि वाघ
बरे
पण शिकलेली माणसं – गुरू नाहीत – ग खरे''

गुरूमधील पशुत्ववृत्तीचा प्रत्यय घडविणारी ही कविता आहे.

२. गंगाधर कुरसंगे

'विसाव्या शतकात' या गंगाधर कुरसंगे यांच्या कवितेत स्वातंत्र्योत्तर काळात जातियता, अस्पृश्यता, वेठबिगारी, दारिद्र्य या समस्यांना सामोरे जावे लागते. आदिवासी विकासाच्या आर्थिक उपाययोजना, आरक्षणाच्या सवलती असल्या तरी आदिवासी दारिद्र्यरेषेखाली असतो. स्पर्धा व गुणवत्तेमुळे जग फार पुढे गेले आहे, अशा अवस्थेत

''या विसाव्या शतकात सुद्धा
'पॉव्हर्टी लाइन' च्या खालीच मी
तरीही ओरड चोहोबाजुनी
'साल्याची राखीव जागा बंद करा'
कारण म्हणे
जग फार पुढे गेलंय!''

३. लक्ष्मण कदम

शहादा जि. धुळे येथील भारतीय कष्टकरी संघटनेचे कार्यकर्ते आणि कवी म्हणून लक्ष्मण कदम यांचा लौकिक आहे. त्यांच्या 'आदिमानव' या कवितेतून सातपुड्याच्या खोऱ्यातील तापीकाठचा आदिम मानव आपल्या हक्क व अधिकारांसाठी क्रांतीची मशाल घेऊन पेटून उठेल, असा आशावाद प्रकट केला आहे. वर्णवादी व्यवस्था, भांडवलशाही व्यवस्थेने आदिवासींचे जीणे बेसूर करून टाकले आहे. त्या शोषक व्यवस्थेशी युद्ध करण्यास कवीचे मन युद्धसज्ज आहे.

''निर्भयतेची बांधून खूणगाठ
करीन भांडवलशाहीशी दोन हात''

'माझा आदिवासी' या कवितेत लक्ष्मण कदम यांनी सातपुड्यातील भारतमातेच्या बालकांना अन्न, वस्त्र, निवारा यांची वानवा आहे. मूलभूत गरजांपासून ते वंचित आहेत, ते कसे

''सातपुड्याच्या सातही पुड्यांवर
आदिवासींचे घर, असून नाही,
अशाही त्या घर – बेघरात
सात सेकंदांचं सुख नाही''

सप्त बाहुबल असलेल्या सरस्वतीच्या एकाही हाताचा आशीर्वाद सातपुड्यातील आदिवासींना मिळत नाही.

४. रा. वि. भुस्कुटे

'आदिवासी आला कुठून राहिला कुठे!' या कवितेतून कवी रा. वि. भुस्कुटे यांनी रानवस्तीची रचना, ग्रामरचनेत काही बदल सुचविले आहेत. आदिवासी झोपडीची नोंद करण्यास ग्रामसेवक तलाठी नकार देतात. दुसरीकडे गावठाणात जमिनीची मालकी असलेले जमीनदार व सावकार आदिवासींना जुमानत नाही. त्यांच्या शोषणाला बळी पडावं लागत आहे. गावठाणात मालकी हक्काची जागा अजून एकजुटीने ठरवायची आहे. कारण

''आदिवासी आला कुठून राहिला कुठे

विचार करून सगळयांनी ठरवायचं हाय
पाडा गांव प्रांत सारं बदलायचं हाय
श्रमजीवीचं राज्य आता आणायचं हाय''

ग्रामरचनाच बदलून कष्टकऱ्यांच्या राज्याचे स्वप्न कवी बघत आहे.

५. पुरुषोत्तम सेडमाके

'नृत्य माझ्या माऊलीचे' या कवितेत कवीने आदिमांच्या सांस्कृतिक परंपरेचे समर्थन केले आहे. रेलाँसारख्या नृत्यामध्ये नाचणारी गोंड स्त्री अर्धनेसूतील वनपरी, नक्षीदार गोंदण, गळयात डागीव माळ, हातात कंकण या शृंगारामुळे ती माधुर्य व मोहकता निर्माण करते. या नृत्यांमध्ये सर्व भेदाभेद गळून पडतात. या सांस्कृतिक संदर्भाचे कवीने उदात्तीकरण केले आहे, ते असे

''वनकन्यांनो!
रानकुसात जपलेल्या परंपरेचे पाईक म्हणून
संस्कृती सावरणाऱ्या संवर्धक म्हणून
माझे विनम्र अभिवादन!''

६. दशरथ मडावी

न्यायालयीन प्रक्रियेमध्ये पुराव्याला विशेष महत्त्व असते. खोट्या पुराव्यामुळे सत्यवादी फासावर जातात. डाकूंच्या पुराव्यामुळे खुनी निर्दोष सुटतात. परंतु आदिवासींना गुन्हेगार समजल्यावर त्यांना प्रथमत: माणूस असल्याचा पुरावा सादर करावा लागतो. हा अनुभव 'पुरावा' या कवितेतून शब्दबद्ध करतात. तो असा की

''परंतु एखाद्या गोंडावर । एखाद्या कोलामावर
अतिक्रमण केल्यावर गुन्हेगार केले जाते
तेव्हा,
त्याला प्रथम द्यावा लागतो
माणूस असल्याबद्दलचा पुरावा''

आदिवासींना माणूसच समजले जात नाही, अशा अमानवी वृत्तीचा प्रत्यय कवी घडवतात.

७. रायसिंग ठाकरे

'दोन भिलोरी कवितांचा मराठी अनुवाद' यापैकी पहिल्या कवितेतून धुळे जिल्ह्यातील दुष्काळामुळे निर्माण झालेली भीषण पाणीटंचाई, रोजगाराचा अभाव, सरकारचे दुर्लक्ष यामुळे कातकरी हवालदिल होतात. अशा कातकरी बंधूंना कवी लढ्यासाठी, दुष्काळग्रस्तांच्या मागण्या पदरात पाडून घेण्यासाठी विद्रोहाची हाक देत आहे. उदा.

''लवकर ये रे गड्या कातकरी बंधु भगिनी
शहाद्याच्या बाजराला मोर्चा घेऊन जाऊ...''

स्वातंत्र्योत्तर चाळीस वर्षांत आदिवासींना जगण्यासाठी, अस्तित्वासाठी संघर्षाशिवाय पर्याय नाही. ही जाणीव यातून प्रतीत होते.

दुसऱ्या कवितेतून कवीने मोळी विकणाऱ्या आदिवासी बांधवांची व्यथा चित्रित केली आहे. उपाशी – तापाशी मोळीची लाकडे गोळा करून बाजारात गेल्यावर हरामी मालदार मोळीची किंमत देण्यास कचरतात.

यामुळे दारिद्याला सामोरे जावे लागते. म्हणून कवीने या कवितेतून मोळीकरी व मालदार यांच्यातील सामाजिक व आर्थिक विषमता संपविण्याचे आवाहन केले आहे, ते असे की

''एकी करू या नी नष्ट करू मालदारी
कष्टकऱ्यांवरच हे बंगले आहेत उभे
कष्टकऱ्यांच्या राज्याची गोष्ट मी सांगतो''

अशी आर्थिक – सामाजिक न्यायाची भूमिका कवीने घेतली आहे.

८. संघजा मेश्राम

संघजा मेश्राम या पहिल्या पिढीतील दुसऱ्या आदिवासी कवयित्री आहेत. 'रेणू भोये' या कवितेत कवयित्री आपल्या रेणू भोये या सखीशी संवाद साधतात. गवत कापणाऱ्या कष्टकरी स्त्रीचे चित्रण केले आहे. गवताच्या मजुरीतून मुलाला शिक्षणाचा मार्ग दाखविण्याची ओढ आहे. उदा.

''पोर्ग आलं धावत, 'आये, पाटी घे पाटी
पाटीसिवा साळा मंजी पाण्यासिवा मळा''

दारिद्य, कर्ज, रोजगार हे आदिवासी स्त्रीचे नित्याचे प्रश्न आहेत. यातून मार्ग काढण्यासाठी बोथट विळयाची गरज नाही. धारदार विळयाशिवाय ते शक्य नाही. धारदार विळयाने या कवितेची नायिका आपले एक एक स्वप्न कापत सुटते आहे. एकूणच लढ्याची तीव्रता वाढविण्याची गरज कवयित्री सूचित करतात.

'अवन्ती गेडाम' ही संघजा मेश्राम यांची दुसरी कविता होय. या कवितेत बाप – लेकीच्या संवादातून आदिवासी स्त्री – पुरुषाच्या नात्यातील दुरावा सूचित केला आहे. मुलीने कापूस वेचून मिळविलेले पैसे तिच्या वडिलांना व्यसनासाठी हवे आहेत. या कन्येला जत्रेमध्ये रेलाँमध्ये नाच – गाणे अधिक आवडते. दुसरीकडे या कन्येला आदिवासींची देवता इंदरवली व शहीद वीराचं स्मरण होत आहे. अशी परंपरा आणि ऐतिहासिक भान असलेली गोंडकन्या आहे. तिच्या भवितव्याची काळजी करणारे वडिलांसह अनेक आहेत.

९. सोपान सुरकुले

सह्याद्रीच्या खोऱ्यात वास्तव्यास असलेल्या महादेव कोळी, शेतकोळी जमातींमध्ये वर्षानुवर्षे भरघोसपणे दारिद्याचे पीक जोमात येते. कोळवणसारख्या ऐतिहासिक वैभवी साम्राज्याची शपथ घेता – घेता दारिद्यात पिचून जाणारा आदिवासी मावळा आहे. या मावळयाच्या सुख, दुःखाचा प्रतिध्वनी आज ऐकू येत नाही. कारण

''सह्याद्री तुम्ही मी सर्वांनी पाहिला
आता सह्याद्रीतून
येत नाही प्रतिध्वनी, ऐकू येतो गाज
ढोलागत घुमतो प्रतिघात! प्रतिघात! प्रतिघात!''

सह्याद्री कूस बदलतोय. आदिवासींच्या अन्याय, अत्याचाराविरुद्ध आवाज बुलंद होत आहे. हे 'गाज' या कवितेतून ध्वनित होते.

'बापूच्या देशात' या कवितेत कवी सोपान सुरकुले यांनी राष्ट्रपिता म. गांधीजींच्या अहिंसेच्या देशात सबलता दुर्बलतेवर अधिकार गाजवून स्वतःला शूर समजते. म्हणूनच अपराधी, गुन्हेगार, खुनी यांना अभय मिळते आणि निरपराध्यांना, सात्त्विकांना कोठडीत मारले जाते. गांधीजींचे स्मरण करून सत्तेचे वारकरी शासन भ्रष्टाचाराला दैवत मानतात. म्हणून कवी म्हणतात

''आणि बापू येथील गरीब केवळ 'रुपयांसाठी'

मारायला नी मरायलाही तयार होतात
आता आदिवासी, दलित म्हणे
तेच खरे सत्ताधीश आहेत
पण – बापू स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षांनंतरही
ते अजून भूकेचे बळी ठरतात''

आरक्षणविरोधी मानसिकता, भूकबळी, कुपोषण ही स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षांनंतरची समस्या आहे.

१०. प्रभू राजगडकर

'इंद्रावतीच्या काठावरून' या राजगडकर यांच्या कवितेतील जीवन मरणाच्या युद्धात सहभागी झालेले इंद्रावतीच्या काठावरील आदिवासींनी आता एल्गार पुकारलेला आहे. पर्यावरण रक्षणाच्या नपुंसक चर्चा कवीला नको आहे. गोंडवनातील क्रांतिवीर बाबूराव शेडमाके, बाबूराव राजगोंड, बिहारचा बिरसा मुंडा किंवा शहीद आदिवासी वीर या सर्वांचेच कवीला स्मरण होत आहे. या सर्वांनीच पारतंत्र्याच्या काळात विषम न्यायव्यवस्था नाकारली होती. अशा वीरांच्या आठवणीत

''मुक्तीचा मार्ग माझा मीच शोधणार
कधी आलाच या वाटेवर तर,
माझा उल्लेख 'वनवासी' करू नका
मला सांगू नका तत्त्वज्ञान मानवतेचे
मुळात मीच एक तत्त्वज्ञान, गूढरम्य मानुषता''

हे स्वयंनिर्धारित तत्त्वज्ञान मध्यमवर्गीयांच्या आदिवासींविषयक बेगडी प्रेमाला, म्युझियममधील आदिम कलात्मकतेला छेद देणारे आहे.

११. रवी कुरसंगे

'अनेक वर्षापासून' या कुरसंगे यांच्या कवितेतून हिंसक व सैतानी प्रवृत्तीने अराजक माजविणाऱ्या अनेक बाबी निर्माण करून ठेवल्या आहेत. मोहेंजोदरो आणि हडप्पा संस्कृतीतील अवशेषही जपणुकतेच्या नावाखाली म्युझिअममध्ये बंदिस्त करून ठेवले आहे. निसर्गघटकांची अराजकता समजू शकतो, परंतु मानवनिर्मित अराजकतेचं स्वरूप असे की

''इतिहासातील कबरीत
सडत कुजत गारढोण पडलेल्या उध्वस्त मढ्यांना
जागवून''

१२.चामुलाल राठवा

आदिवासी कवीच्या प्रथम पिढीतील प्रतिभावंत कवी म्हणून चामुलाल राठवा ओळखले जातात. वडोदरा (गुजरात) येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'ढोल' या नियतकालिकात त्यांच्या 'आता तुम्ही सुरू करा क्रांती' या कवितेतून समाजाला युद्धमान होण्याचा सल्ला देतात. आदिवासींचे अस्तित्व शाबूत ठेवण्यासाठी क्रांतीशिवाय पर्याय नाही. यासाठीच, 'बंधूंनो ही सोडा हो विश्रांती, आता तुम्ही सुरू करा क्रांती'

'चला मग आदिवासी भागात' या कवितेत जीवघेणं धरण, कोळसा – तांबे – शिसे – गुलाबी माती या सर्वांची खाण, जंगलतोड, संशयित भिल्ल गुन्हेगार हे सर्व आदिवासी प्रदेशात सहज शक्य आहे.

आदिवासींच्या असहाय्य व अगतिकतेचा फायदा घेऊन त्यांची परवड केली जाते. आदिवासी भागात रोजगार हमी व शिक्षणाच्या योजना राबवून भ्रष्टाचाराची कुरणे निर्माण केली जातात. त्यातून आर्थिक शोषण केले जाते. उदा.

''काढा लवकर रोजगार हमी
काम जास्त रोजी कमी
खोटं मस्टर लिहून बघायचं आहे का?
चला मग आदिवासी भागात!''

'सकस आहार' या कवितेत सकस आहाराच्या नावाखाली आदिवासींना शासकीय योजनेतंर्गत जो धान्य पुरवठा केला जातो, तो वास्तवात ''गुरासाठी – मवेशीओं के लिए'' असलेला, सडलेला, किडलेला, टाकावू धान्यपुरवठा केला जातो. यामुळेच

''थाळीभर पाण्यात चिमूटभर टाकून
एक – दोन भाकरींचा काला मोडून
खातो आम्ही मिटक्या मारीत''

या तात्पुरत्या आनंदामागे भीषण दारिद्र्य लपले आहे.

'तुम्ही शिकाल की नाही?' ही चामुलाल राठवा यांची प्रश्नार्थक व संवादात्मक कविता आहे. शिक्षणक्षेत्रातील कमल आणि रमल या आदिवासी विद्यार्थिनीशी कवी शिक्षणविषयक संवाद साधतात. गरिबी, दारिद्र्यामुळे आदिवासी मुलींच्या शिक्षणाचा प्रवास अत्यंत खडतर आहे. यासाठीची सरकारी मदत उशीरा मिळते. भूक, दारिद्र्य, उपासमार अशा विवंचनेत शिक्षण अशक्य आहे.
कारण

''आज आमच्या घरात
धान्य नाही,
मीठ नाही मिरची नाही
काय खाऊन शिकायला जावं?
शिकायला जावं तर खावं काय?
आम्ही तरुण जीव
अन् आमच्या अंगात ह्या चिंध्या?
आम्ही शाळेत येणार कशा?''

गुजरातमध्ये जाऊन, तेथे काम किंवा रोजगार मिळाल्यावर त्यातील मोबदल्यातून शाळेत जाण्याचा इरादा स्पष्ट होतो आहे. इतर विद्यार्थ्यांसारखे हजेरीच्या पटावर गैरहजर असलो तरी आमची नावे ठेवा. मग आम्ही ''जिंकू किंवा न जिंकू, पण शिकू मात्र नक्कीच!'' असा आत्मविश्वास या विद्यार्थिनी आपल्या शिक्षकांना देतात. शिक्षणविषयक जागृती या कवितेतून साकार होते.

'आमची चिंता आमची फिकीर' या कवितेत शासन सत्तेला उद्देशून कवीने काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. शासनाने जंगलावरील आदिवासींचा मालकी हक्क हिसकावून घेतल्यामुळे त्यांच्या मनावर विलक्षण आघात झाला आहे. यामुळे मेलेल्या माणसाच्या आठवणींमुळे जसे अस्वस्थ व्हावे, तशी अवस्था झाली आहे. कारण आदिवासींच्या धारण – पोषण – भरणाचं एकमेव साधन जंगल आहे. होळीसाठी आवश्यक असलेला

दांडा, वखर, पांभर, नळया, दाते, बैलगाडी, घरासाठी लाकडे इत्यादीसाठी आवश्यक असलेले लाकूड आदिवासींना मिळणे दुरापास्त झाले आहे. म्हणून आदिवासी घराची अवस्था

''आमची
किडलेली अन् जीर्ण झालेली घरे
कीड लागून झिजून विरुन जातील
मग आम्ही कोठे जावे?
आम्हाला कोण आसरा देईल?''

निरीक्षणे

१. उषाकिरण आत्राम यांच्या कवितेत आदिवासी जीवन प्रतिबिंबित करणारी प्रतीकात्मक भाषा आविष्कृत होते. उदा. खुरटी झाडे, पंख तुटलेले रावे, फाटकी आतडी, सूर्यसळी, नागकमळी, सूर्यफूल अशा प्रतिमा निर्माण होतात. आश्रमशाळा म्हणजे नराधमांचे कुरण, शोषणाचे सरण अशा शैक्षणिक जीवनातील शोषण साकार करणाऱ्या प्रतिमा आहेत.

२. उषाकिरण आत्राम या सामाजिक बांधिलकी असलेल्या स्त्री कवयित्री आहेत. आदिवासी स्त्री दास्याचे दर्शन त्यांची कविता घडविते. आदिवासी स्त्रीच्या शारीरिक, मानसिक छळाची करुण कहाणी शब्दबद्ध होते आहे. यामुळे तिला स्वत्त्वाची जाणीव करून देणारी कविता आहे. परंपरा, सांस्कृतिकतेला नकार देणारी विद्रोही कविता आहे. संवादात्मकता हे तिचे महत्त्वाचे वैशिष्टये आहे.

३. संघजा मेश्राम यांच्या कवितेत सखीशी संवाद साधला जातो. कष्टकरी आदिवासी स्त्रियांचे आर्थिक शोषण होते. त्यासाठी विळयाच्या धारदारपणातून लढ्याची तीव्रता साकार होते. परंपरा आणि ऐतिहासिक भान राखले जाते.

४. लक्ष्मण कदम, पुरुषोत्तम शेडमाके यांच्या कवितेत अनुक्रमे आरक्षणविरोधी मानसिकता, युद्धसज्जता, रेलाँनृत्याचं समर्थन इ. जाणवते.

५. चामुलाल राठवा यांची कविता क्रांतीप्रवण आहे. संवादात्मक, प्रश्नार्थक आहे.

संदर्भ ग्रंथ व नियतकालिके

१. तुमराम विनायक, (संपा.) शतकातील आदिवासी कविता, हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, २००३,पृ.७३
२. तुमराम विनायक, आदिवासी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा, विजय प्रकाशन, नागपूर, प्रआ. १९९४. पृ.२४३
३. जाधव रा. ग, (संपा.) मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सातवा, भाग पहिला, म. सा. प. पुणे. प्र. आ. मे २००९.
४. तुमराम विनायक, आदिवासी साहित्य: दिशा आणि दर्शन, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. प्र. आ. १५ नोव्हेंबर २०१२.
५. भुस्कुटे रा. वि. 'आदिवासी आला कुठून राहिला कुठे!' (कविता) हाकारा (संपा. रामचंद्र मुटाअकर) जुलै ते डिसेंबर १९८७
६. जोशी अरूणा, ''ढोल'' मे २०००, जानेवारी २००१, दिवाळी अंक २००२, डिसेंबर २००३ चे अंक